मंत्र्यांचा दर्जा दिलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या बैठकांना शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित न राहण्याबाबत.

20160106103900570

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-मुस-१०९२/प्र.क्र. ६५/एक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १ ऑगस्ट, १९९२.

परिपत्रक

शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक-सासपु-१०९०/सीआर-४०/योजना-५, दिनांक ३० जुन, १९९० अन्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत :-

[१] विधानसभा आणि विधान परिषद यातील विरोधीपक्ष नेते, राज्य शासनाच्या काही उपक्रमांचे आणि उच्चस्तरीय समित्यांचे अध्यक्ष इत्यादी महत्वाच्या अशासकीय व्यक्तींना शासनाने मंत्र्यांचा दर्जा, त्या व्यक्तींना त्यांनी धारण केलेल्या पदामुळे त्यांच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या नीटपणे पार पाडता याव्यात या हेतूने दिला आहे.

[२] ज्याप्रमाणे शासनाच्या मंत्र्यांना संबंधित प्रशासकीय कामावर देखरेख करण्याचे व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन अथवा त्यांना भेटीसाठी बोलावून व त्यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांना सूचना-वजा आदेश देण्याचे अधिकार आहेत त्याप्रमाणे अधिकार मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेल्या विधानसभा व विधान परिषद यातील विरोधी पक्षनेते, इत्यादी अशासकीय व्यक्तींना नाहीत व ती त्यांची कार्यकक्षा नव्हे.

[३] दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या व शासनाच्या योजना, प्रकल्प धोरण यांच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत वरील [१] येथील अशासकीय व्यक्तींनी हस्तक्षेप करु नये.

वरीलप्रमाणे स्पष्ट शासन आदेश अस्तित्वात असूनही असे निदर्शनास आले आहे की, विधानसभा व विधान परिषद यातील विरोधी पक्षनेते, शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका बोलावितात वा त्यांनी बोलाविलेल्या बैठकांना शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे अशी सूचना देतात व शासकीय अधिकारी अशा बैठकांना उपस्थित रहातात. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या कामाचा भाग म्हणून एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणी दौरा केल्यास शासकीय अधिकारी त्यांच्याबरोबर अशा दौऱ्यात सहभागी होतात. शासकीय अधिकाऱ्यांच्या या प्रकारच्या कृतीमुळे उपरोल्लेखित शासन आदेशांचे अनुपालन होण्यास कुचराई होत आहे हे स्पष्ट आहे. याकरिता वरील परिपत्रक व विशेषत: वरील परिच्छेदात निर्देशित केलेल्या सूचना शासनाच्या सर्व स्तरांवरील अधिकाऱ्यांच्या पुन्हा एकदा निदर्शनास

[कृ.मा.प.]

या परिपत्रकाव्दारे आणण्यात येत आहेत. शासकीय अधिका-यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अशी शासनाची अपेक्षा आहे. विधानसभा व विधान परिषदांचे विरोधी पक्षनेते आणि अन्य महत्वाच्या अशासकीय व्यक्ती यांनी त्यांच्या कामाचा भाग म्हणून बैठका आयोजित केल्यास, शासकीय अधिका-यांनी अशा बैठकांना उपस्थित न राहण्याबाबत खबरदारी घ्यावी वा जिल्ह्यात दौरा आयोजित केल्यास त्यांनी अशा दौ-यांत त्यांच्याबरोबर सहभागी होण्याचे कटाक्षाने टाळावे. या सूचनांच्या अनुपालनात शासकीय अधिका-यांकडून कुचराई झाल्यास ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील.

वरील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात व त्यांना त्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना द्याव्यात.

या परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

सु. राममूर्ती,
मुख्य सचिव.

प्रति,

सर्व मंत्री/राज्यमंत्री,
सर्व अपर मुख्य सचिव/सर्व प्रधान सचिव/सर्व सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व खाते प्रमुख.

एच-५५०[१०००-८-९२]-अ